# श्रीगुरुमाईंच्या वचनांवर ध्यान

## ईशा सरदेसाई यांच्याद्वारे लिखित

### अभिस्वीकृतीचे महत्त्व

तुम्ही जिथे राहता त्या ठिकाणानुसार, सत्संगाच्या आदल्या रात्री किंवा अगदी काही तास आधी तुम्हाला सत्संग होणार आहे ही माहिती मिळाली असेल. तरीदेखील तुमच्यापैकी अनेक लोकांनी या सत्संगामध्ये सहभागी होण्याचा पूर्ण प्रयत्न केला हे पाहून व याविषयी ऐकून मला खूप आनंद झाला. अनेक लोकांच्या बाबतीत तर असे वाटत होते की, एखादी महान शक्ती त्यांना सत्संगात सहभागी होण्यासाठी मदत करते आहे. जसे की, विस्कॉन्सिनमधील एका सिद्धयोगीने सत्संगानंतर सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर लिहून पाठवले :

> माझी अकरा वर्षांची मुलगी दररोज रात्री प्रार्थना करत होती की, तिला श्रीगुरुमाईंचे दर्शन व्हावे. हा संकल्प अनेक वर्षांपासून तिच्या मनात कायम राहिला आहे.
>
> आज सकाळी, सत्संग सुरू होण्याच्या अगदी थोडाच वेळ आधी आम्हाला तिच्या शाळेतून फोन आला की, शाळेचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. आमच्या परिसरातील अनेक शाळांमध्ये असे घडले होते, पण तिची एकटीचीच शाळा अशी होती, की जिथे जनरेटर काम करत नव्हते, त्यामुळे सर्व मुलांना बसने लवकर घरी पाठवण्यात येत होते. तिने घरात पाऊल टाकले आणि श्रीगुरुमाईंसमवेत नामसंकीर्तन सुरू झाले. तिने श्रीगुरुमाईंबरोबर नामसंकीर्तन केले, त्यांना बोलताना ऐकले, त्यांच्या शिकवणी ऐकल्या आणि त्यांचे दर्शनही घेतले!

बोलायला सुरुवात केल्यावर श्रीगुरुमाईंनी सर्वप्रथम, सर्वांना धन्यवाद दिले, की इतक्या अल्पकालीन सूचनेवरदेखील सर्वजण वैश्विक हॉलमध्ये सत्संगासाठी उपस्थित झाले. माझ्यासाठी ही गोष्ट अतिशय प्रासंगिक होती आणि ती माझ्या हृदयाला स्पर्शून गेली. अभिस्वीकृती देणे, लोकांचे आभार मानणे, त्यांना धन्यवाद देणे हे किती महत्त्वाचे आहे याविषयीचे मार्गदर्शन मला श्रीगुरुमाईंकडून मिळाले आहे आणि श्रीगुरुमाईंनी हेच मार्गदर्शन इतर लोकांनाही दिल्याचे मी ऐकले आहे.

अनेक प्रसंगी श्रीगुरुमाईंकडून विशिष्ट रूपाने आणि व्यक्तिशः अभिस्वीकृती मिळाल्याचे सौभाग्यदेखील मला लाभले आहे. त्या क्षणांमध्ये मी अभिस्वीकृतीची, एखाद्याच्या कार्याची जाण ठेवून त्यासाठी आभार व्यक्त करण्यात असलेली संपूर्ण शक्ती अनुभवली आहे—माझ्या हृदयात व त्याच्या सभोवताली सूर्याच्या तेजासमान असलेल्या सोनेरी प्रभेच्या रूपात आणि माझेदेखील महत्त्व आहे या अटळ विश्वासाच्या रूपात मी ती शक्ती अनुभवली आहे. जे काही मी करते आहे त्याला महत्त्व आहे. मला श्रीगुरुमाईंकडून माझ्या कार्यासाठी जेव्हाजेव्हा अभिस्वीकृती वा प्रशंसा प्राप्त झाली आहे, तेव्हातेव्हा मला असे वाटले आहे की, मी कोणतीही गोष्ट करू शकते, मी कोणत्याही आव्हानाचा सामना करू शकते आणि श्रीगुरुमाईंसाठी व त्यांच्या मिशनसाठी असे करणे ही माझ्यासाठी अतिशय आनंदाची बाब असेल.

मला इतर लोकांकडूनही बरीच प्रशंसा प्राप्त झाली आहे. मी स्वतःची फुशारकी करण्यासाठी हे सांगत नाही [खरच! माझ्यावर विश्वास ठेवा!], तर याउलट मी हे सांगू इच्छिते की, एखादी व्यक्ती जेव्हा वेळ काढून तुमच्या कामाला, तुमच्या मेहनतीला दाद देते, तेव्हा कसे वाटते हे मला माहीत आहे. खूप फरक पडतो याने. मला जी-जी स्तुती मिळाली, माझ्या कार्यासाठी जेव्हाजेव्हा मला दाद दिली गेली, तेव्हा त्याने माझ्यात खूप फरक पडला आहे. आणि मला आशा आहे की, मी ज्या-ज्या लोकांच्या कामाला दाद दिली आहे, त्यांची प्रशंसा केली आहे, त्यांनादेखील हेच जाणवले असेल—त्यांच्याप्रति व्यक्त केलेली माझी खरी कृतज्ञता त्यांनी अनुभवली असेल.

वैश्विक हॉलमध्ये येण्यासाठी श्रीगुरुमाईंनी जेव्हा सर्वांना धन्यवाद दिले, तेव्हा असे वाटले की, मी अभिस्वीकृतीविषयी, धन्यवाद देण्याविषयी जे काही शिकले आणि अनुभवले आहे, ते माझ्या अंतरी सामावले गेले. मला स्मरण झाले की, हा अभ्यास किती महत्त्वाचा आहे. आपण लोकांना हे ‘नक्कीच’ सांगितले पाहिजे की, त्यांचे प्रयत्न प्रशंसनीय आहेत. अनेक संस्कृतींमध्ये, अशा प्रकारची प्रशंसा करणे, धन्यवाद देणे किंवा कृतज्ञता व्यक्त करणे हा समाजाच्या सुसंस्कृत आचरणाचा भाग आहे. काही लोक या शिष्टाचाराचे पालन करतात; काही करत नाहीत. तथापि, सिद्धयोग मार्गावर श्रीगुरुमाईंनी आपल्याला शिकवले आहे की, असे करणे चांगले व आवश्यक आहे. इतरांप्रति कृतज्ञ असणे, ही एक प्रकारची पूजा आहे. हृदयापासून धन्यवाद देणे ही प्रार्थना आहे. मला असे वाटते की, त्या दिवशी श्रीगुरुमाईंनी आपल्याला जी अभिस्वीकृती दिली, ती आपल्यापैकी प्रत्येकासाठी त्यांचा प्रसाद होता.

तेव्हा आता, मी विचार करते आहे : *तुम्ही* लोकांना कशा प्रकारे धन्यवाद देता, कशा प्रकारे *तुम्ही* इतरांना अभिस्वीकृती देता, कशा प्रकारे त्यांच्या कार्याला दाद देता?

© २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.